'कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या निवडक ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास' (१८६०-१९३४)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या
मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील पीएच्.डी.
पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा.

संशोधक

भागुअत सुरेशराव जाधव

(एम.ए.इतिहास,सेट)

ता.गंगाखेड,जि.परभणी.

मार्गदर्शक

डॉ.सचिन उत्तमराव हंचाटे

संशोधन मार्गदर्शक,सहयोगी प्राध्यापक तथा इतिहास विभागप्रमुख,

मास्टर दीनानाथ मंगेशकर महविद्यालय,

औराद शहाजानी,ता.निलंगा,जि.लातूर.

(2022)

प्रस्तावना -

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत होऊन महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचा प्रारंभ झाला. सन १८१८ पासून महाराष्ट्रात राजकीय पारतंत्र्याच्या नवीन युगाला प्रारंभ झाला. हे नवे राजकीय पारतंत्र्य काही काळ लोकांना आपलेसे वाटू लागले.कारण पेशवाईत महाराष्ट्रात जुन्या चालीरीती,कुप्रथा आणि अंधश्रद्धेचे स्तोम माजले होते.'जुने ते सोडू नये आणि नवे ते स्वीकारू नये' असा नियमच बनला होता.ब्रिटिश राजवटीने महाराष्ट्रीय समाजाची ही स्थितीशीलता नष्ट करून सामाजिक प्रगतीची प्रेरणा दिली.महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गाला कायद्याचे प्रभुत्व व समानतेवर आधारलेली ब्रिटिशांची नवीन शासन पद्धती हवीहवीशी वाटू लागली. शिक्षणाचा प्रसारही हळुहळु तळागाळापर्यंत होऊ लागला.उच्चवर्णीय तरुणांना प्रशासनामध्ये नोकऱ्या मिळू लागल्या.त्यामुळे राजनिष्ठावृत्तीचा असा नवा शिक्षित वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला. दळणवळणाची साधने वाढल्याने गावांची स्वयंपूर्णता नष्ट झाली. ग्रामपंचायतीची जागा न्यायालयाने घेतली. प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळण्याची पद्धती अस्तित्वात आली. व्यक्तीला आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव होऊ लागली. या राजकीय परिवर्तनाचा लोकांच्या जाणिवा-आकांक्षावर कळत नकळत मोठा परिणाम होत गेला. सृष्टी बदलल्यावर दृष्टीही बदलण्याची गरज लोकांना वाटू लागली.एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राजकीय व सामाजिक चळवळीने

आजच्या महाराष्ट्राची पार्श्वभूमी तयार केली.एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांच्या पाश्चिमात्य विचारसरणीने व ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या चळवळीने आणि एल्फिन्स्टनसारख्या गव्हर्नरच्या शैक्षणिक सुधारणांमुळे महाराष्ट्रात अनेक वैचारिक बदलांना सुरुवात झाली. नवीन शिक्षण पद्धती, वैचारिक प्रबोधन आणि कायद्यापुढे समानता या तीन बाबीतून महाराष्ट्राचे समाजमन आकार घेऊ लागले.महात्मा फुलेंसारख्या सत्यान्वेशी नेतृत्वाचा उदय याच काळात झाला. २४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून ब्राम्हणी वर्चस्वाच्या इमल्याला हादरे दिले.त्यामुळे अब्राह्मणी चळवळीला बळ प्राप्त झाले.ब्राम्हो समाज,आर्य समाज आणि प्रार्थना समाज यांसारख्या संघटनांच्या वैचारिक जागृतीने सामाजिक आणि धार्मिक प्रबोधनाला गती मिळाली.महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर समाज प्रबोधनाचा नांगर छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या हाती घेत इथल्या मातीची वैचारिक मशागत केली.यातून भास्करराव जाधव,आण्णासाहेब लठ्ठे,श्रीपतराव शिंदे,दिनकर जवळकर,कर्मवीर भाऊराव पाटील यासारखे बहुजन नेतृत्व उदयास आले. महाराष्ट्रातील वैचारीक चळवळीतून जे लेखक, विचारवंत, पत्रकार, समाज प्रबोधनकार निर्माण झाले त्यामध्ये वृत्तपत्र संपादक, ऐतिहासिक चरित्रलेखक म्हणून कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचा समावेश होतो.सामाजिक चळवळीच्या निमित्ताने केळुसकरांचा महात्मा फुले, नारायण मेघाजी लोखंडे, महाराजा सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामचंद्र धामणस्कर, हाईम किहिमकर इत्यादींशी संबंध आला होता. केळुसकरांमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील अनेक दुवे

जोडले गेले आहेत.केळुसकरांचा दृष्टिकोन पूर्णपणे विज्ञानवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी होता. त्यांनी वर्तमानपत्रात लेख लिहून,व्याख्याने देऊन आपले विचार प्रखरपणे मांडले. इतिहासात काहींना झुकते माप मिळते तर काहींवर अन्याय होतो.एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील थोर ब्राम्हणेतर विद्वान कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या बाबतीत असच झाल्याचे दिसून येते. केळुसकर हे बहुदा मागील तीन-चार पिढ्यांपासून फारसे कोणाला माहित नसावेत.त्यांनी चार तप केलेले साहित्य लेखन पाहून कोणीही थक्क होईल. केळुसकर यांनी सन १९०७ साली देशी-परदेशी ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे' विस्तृत,समग्र असे स्वतंत्र चरित्र लिहिले तसेच त्यांनी गौतम बुद्ध,तुकाराम महाराज यांचे अभ्यास पूर्ण चरित्र लिहिले आहे.त्यांनी थेट संस्कृतमधील सात उपनिषदांचे इंग्रजीत भाषांतर केले आहे.असे करणारे बहुदा ते पहिलेच ब्राम्हणेतर असावेत. त्यांनी लिहिलेले 'गौतम बुद्धांचे चरित्र' महाराष्ट्रभर गाजले.मराठी भाषेतील एक उत्कृष्ट ग्रंथ म्हणून ते गौरविले गेले.दक्षिणा प्राईज कमिटीने या ग्रंथाला पारितोषिक देऊन सन्मानित केले. 'श्रीमद् भगवद्गीता समन्वयपद बोध,सार्थ आणि सटीक' हा ग्रंथ १९०२ साली प्रसिद्ध केला.या ग्रंथामुळे केळुसकर यांच्या पांडित्याची, धर्मशास्त्रज्ञाची, वेदांत विषयक ज्ञानाची महती कळते. याशिवाय त्यांनी अनेक चरित्रग्रंथांचे लेखन केले आहे.

कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यातील केळुस या गावी २० ऑगस्ट १८६० रोजी एका आर्थिकदृष्ट्या मागास अशा मराठा कुटुंबात

झाला.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मॅट्रिक पर्यंत शिक्षण घेतले १८८१ साली मुंबईतील विल्सन हायस्कूल मधून मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी मुंबईतीलच इस्त्रायली शाळेत शिक्षकाची नोकरी मिळविली. या शाळेत त्यांनी चार वर्षे सेवा केली. त्यानंतर त्यांनी १८८६ ते १९२५ पर्यंत म्हणजे ३९ वर्षे विल्सन हायस्कूल मुंबई येथे अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे नोकरी केली. एक ध्येयवादी, शिस्तप्रिय, कुशल, निष्ठावंत आणि आदर्श शिक्षक म्हणून लौकिक संपादन केला. गरीबी काय असते हे त्यांनी स्वतः अनुभवले होते.शिक्षक म्हणून नोकरी करत असताना गरीब,निराश्रित आणि होतकरू विद्यार्थ्यांना मदत मिळावी म्हणून ते झटत असत.पसधन लोकांनी या गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करावी म्हणून ते प्रयत्न करत. अध्यापनाचा व्यवसाय उपयुक्त, पवित्र आणि देश बांधवांचे कल्याण साधणारे आहे या विचारांनीच केळुसकर यांनी नोकरी केली .कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या साहित्याचा आवाका मोठा आहे. ते कार्याकडे ध्येय म्हणून पाहत होते. केळुसकरांच्या लेखनास सुरुवात झाली ती बडोदा संस्थानच्या ‘राष्ट्रकथेमाले’करिता १८८३ साली लिहिलेल्या 'फ्रान्सचा जुना इतिहास’ या ग्रंथापासून. केळुसकरांनी छोटेखानी आत्मचरित्र सुद्धा लिहिले आहे. धनंजय कीर यांनी लिहिलेल्या केळुसकरांच्या चरित्रात ते वाचायला मिळते. कीर यांनी केळुसकरांचे वर्णन 'ऋषितुल्य प्रज्ञावंत’ असे केले आहे.केळुसकरांचे सारे साहित्य व कार्यपाहता ते यथार्थ आहे.तत्कालीन ब्राह्मण समाज बहुजन-मराठा समाजाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो याचा अनुभव त्यांना वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी आला आहोत हा अनुभव फारच कटू होता. १८८७ साली मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत वामन आबाजी मोडक यांचे व्याख्यान

झाले. या व्याख्यानावर कृष्णाजी केळुसकर यांनी इंदुप्रकाश मध्ये मुद्देसूद टीका केली.त्यानंतर दोन दिवसांनी ब्राह्मण मित्रमंडळी चौपाटीवर बोलत बसली होती त्यांना पाहून केळुसकर त्यांच्याकडे सहज गेले. त्यावेळी एकाने त्यांच्या भाषेचे कौतुक केले. ते म्हणाले ‘हा मराठा असून चांगले कसे लिहितो? यावर दुसरा ब्राह्मण जोरातच म्हणाला, “जरी हा मराठा असला तरी ब्राह्मणाशिवाय इतरांना शुद्ध मराठी लिहिता येणार नाही.धार्मिक विषय तर त्यांना समजण्यास शक्य नाही. अनेकांच्या या तुच्छतादर्शक आणि अपनास्पद उद्गारांचा केळुसकर यांच्या तरुण मनावर मोठा आघात झाला. त्यांचे स्वाभिमानी मन खडबडून जागे झाले. त्यांनी त्याच वेळी “मी रात्रंदिवस कष्टाने मराठीचा व्यासंगपूर्ण,सखोल अभ्यास करेल आणि शुद्ध मराठीत संशोधनपर दर्जेदार ग्रंथ निर्मिती करेल” अशी प्रतिज्ञा केली. या प्रतिज्ञाप्रमाणे त्यांनी आपल्या पुढील जीवनात एकापेक्षा एक दर्जेदार ग्रंथ लिहिले आणि ऐतिहासिक साहित्यात मोलाची भर घातली.केळुसकरांचा दृष्टिकोन पूर्णपणे विज्ञानवादी, बुद्धीप्रामाण्यावादी होता.त्यांचे विचार व्यापक आणि दूरदृष्टी संपन्न होते.त्यांनी व्याख्याने देऊन, वर्तमानपत्रात लेख लिहून, ग्रंथ लिहून सामाजिक सुधारणा विषयी आपले विचार परखडपणे समाजासमोर ठेवले. सामाजिक सुधारणा विषयी अनेक बुद्धिमान लोक उदासीन होते अशा काळात केळुसकर यांनी निर्भीडपणे बालविवाह, पुनर्विवाह, कन्या विक्रय ,लग्नात हुंडा देणे- घेणे, जाती विषमता, अस्पृश्यता अस्पष्टता इत्यादी अनिष्ट रूढी, परंपरा विरोधी भूमिका घेतली. त्यांच्यावर महात्मा फुलेंच्या विचारांचा प्रभाव होता. मुंबईतील सत्यशोधक चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग

घेतला.प्रस्तुत संशोधनातून केळुसकरांच्या जीवनचरित्रातील अनेक पैलूवर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

कृष्णराव अर्जुन केळुसकर यांची साहित्य संपदा

१) फ्रान्सचा जुना इतिहास (१८९३)

२)तुकारामचरित्र अर्थात तुकारामबावांचे चरित्र

३)सेनेका व एपिक्टेटसची बोधवचने (१८९७)

४)गौतम बुद्धांचे चरित्र(१८९८)

५)सात उपनिषदांचे मराठी भाषांतर(१८९८)

६)जुन्या कराराचे मराठी भाषांतर

७)राइट्स ऑफ मॅन(थॉमस पेन)चे मराठी भाषांतर

८) नीतिबोधमाला भाग एक

९) नीतिबोधमाला भाग दोन

१०)नीतिबोधमाला भाग तीन

११)नीतिबोधमाला भाग चार

१२)भगवद्गीतेवर टीकात्मक ग्रंथ(१९०२)

१३)छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र(१९०७)

कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी लिहिलेली इतर व्यक्तींची चरित्रे

१)एलाप्पा बाळाराम

२)गुणाजीराव घुले

३)स्वामी गोविंद जनार्दन बोरकर

४) जनाबाई रोकडे

५)माधवराव रोकडे

६)म्युर मॅकेन्झी

७)रामचंद्र विठ्ठल धामणस्कर

विषय निवड

महाराष्ट्राला कृष्णराव अर्जुन केळुसकर या व्यक्तिमत्वाची ओळख डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षक आणि त्यांना गौतम बुद्धांची ओळख करून देणारे एवढीच असल्याचे दिसून येते.मुळात कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी चार तपांपेक्षाही अधिक काळ खर्च करत सात हजार पानांहून अधिक लेखन केले आहे. परंतु अब्राह्मणी इतिहासकारांनी आणि पुरोगामी महाराष्ट्रातील वाचकांनी केळूसकरांच्या एकूण लेखनाची म्हणावी तशी दखल घेतली अस म्हणता येणार नाही.आज वर त्यांच्या लेखनाची उपेक्षाच झाली.एक माध्यमिक शिक्षक असलेल्या केळुसकरांनी संपूर्ण आयुष्यात अनेक लहान - मोठे ग्रंथ लिहिले पण त्यांनी लिहिलेले गौतम बुद्धांचे चरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराज चरित्र वगळता अभ्यासकांनी या बहुजन समाजाच्या महर्षीकडे पूर्णतः पाठ फिरवली असल्याचे दिसून येते.त्यांचे संत तुकारामबावांचे चरित्र हा मराठीतील पहिला गद्य स्वरूपातील विवेकवादी चरित्र ग्रंथ १८९६ साली प्रकाशित झाला.पण हा ग्रंथ बऱ्याच वाचकांना माहीत नाही.गतकाळात त्यांची उपेक्षा झाली असली तरी भविष्यातील इतिहासकारांना आणि अभ्यासकांना या अब्राह्मणी वाङमय महर्षीची

ओळख पुन्हा करून घेण्याची गरज असल्याने आणि कृष्णराव अर्जुन केळुसकरांच्या ऐतिहासिक लिखाणातील काही पैलूवर प्रकाश टाकण्याचा हेतूने संशोधकाने हा विषय निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या साहित्याचा आवाका प्रचंड मोठा आहे.त्यांनी फ्रान्सचा जुना इतिहास (१८९३), तुकारामचरित्र अर्थात तुकारामबावांचे चरित्र, सेनेका व एपिक्टेटसची बोधवचने (१८९७),गौतम बुद्धांचे चरित्र(१८९८),सात उपनिषदांचे मराठी भाषांतर(१८९८),जुन्या कराराचे मराठी भाषांतर,राइट्स ऑफ मॅन(थॉमस पेन) चे मराठी भाषांतर, नीतिबोधमाला भाग एक,दोन,तीन व चार,भगवद्गीतेवर टीकात्मक ग्रंथ(१९०२),छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र , तसेच एलाप्पा बाळाराम,गुणाजीराव घुले,स्वामी गोविंद जनार्दन बोरकर,जनाबाई रोकडे,माधवराव रोकडे,म्युर मॅकेन्झी,रामचंद्र धामणस्कर इ.व्यक्तींची चरित्रे लिहिलेली आहेत.ऐतिहासिक संशोधनात विषयाला न्याय देण्यासाठी विषयाची व्याप्ती मर्यादित असणे गरजेचे असते.म्हणून 'कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या निवडक ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास' (१८६०-१९३४) हा विषय निवडत असताना संशोधकाने कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या फ्रान्सचा जुना इतिहास, संत तुकाराम अर्थात तुकारामबावांचे चरित्र,गौतम बुद्ध यांचे चरित्र व छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र या निवडक ग्रंथांची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्या जीवनचरित्राचा मागोवा घेणे.

२) कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्या ऐतिहासिक लिखाणामुळे महाराष्ट्रातील अब्राह्मणी चळवळीला मिळालेल्या प्रेरणेचा शोध घेणे.

३) वृत्तपत्र संपादक आणि समाजसुधारक म्हणून कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचा सुधारणावादी दृष्टीकोन अभ्यासणे.

४) एक वस्तुनिष्ठ अब्राह्मणी इतिहासकार म्हणून कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचे ऐतिहासिक साहित्य अभ्यासने.

संशोधनाची गृहितके

संशोधन करताना तथ्य संकलनास दिशा मिळावी व निष्कर्षा पर्यंत पोहोचता यावे या करीता संशोधकाने काही गृहितके निश्चित केली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्रातील अब्राम्हणी चळवळीच्या जडणघडणीत कृष्णराव अर्जुन केळूसकर यांनी भरीव योगदान दिले.

२) कृष्णराव अर्जुन केळुसकर हे अब्राह्मणी इतिहासकारांचे प्रेरणास्रोत होते.

३) कृष्णराव अर्जुन केळुसकर हे बहुजनसमाजातील प्रकांड पंडित होते.

४) कृष्णराव अर्जुन केळुसकर हे वस्तुनिष्ठवादी इतिहासकारांच्या मालिकेतील एक अग्रणी होते.

५) वृत्तपत्र संपादक आणि लेखक म्हणून कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी सुधारणावादी दृष्टीकोन अंगीकारले.

६) कृष्णराव अर्जुन केळुसकर यांनी बहुजन समाजाला जागे करण्याचे कार्य केले.

७) कृष्णराव अर्जुन केळुसकर हे महात्मा फुलेंच्या विचारांनी प्रभावित झाले होते.

संशोधन पद्धती :

संशोधनात संशोधन पद्धती हा विषयाचा गाभा असतो.कोणतेही संशोधन शास्त्रीय पद्धतीने केले तरच त्याचा उपयोग होतो.अन्यथा चुकीच्या पद्धतीवर आधारलेल्या संशोधनातून चुकीचे निष्कर्ष निघतात. संशोधन पद्धती ही सिद्धांत, उद्देश, स्वरूप आणि संशोधन विषय यावर अवलंबून असते.प्रस्तुत संशोधनाचा विषय 'कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या निवडक ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास'(१८६०-१९३४) असा आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्धतीतील ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे ज्यात नवीन सिद्धांत न मांडता वस्तुनिष्ठपणे मांडणी केलेली असते.

विषयाचे महत्त्व

१) आधुनिक काळातील अब्राह्मणी चळवळीला प्रस्तुत संशोधन मार्गदर्शक ठरेल.

२) प्रस्तुत विषयावरील संशोधनामुळे ऐतिहासिक संशोधन आणि चरित्र लेखन करणाऱ्यांना प्रस्तुत संशोधन उपयोगी पडेल.

३) प्रस्तुत विषयावर म्हणावे तेवढे संशोधन झालेले नसल्यामुळे संबंधित विषयावर संदर्भ उपलब्ध करून देण्यात येईल.

४) प्रस्तुत संशोधन आधुनिक काळातील सामाजिक,राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील अडचणींना दिशादर्शक ठरेल.

५) सध्या जातीव्यवस्था अधिक बळकट होत आहे.या काळात अब्राह्मणी इतिहासपुरुषांचे विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचणे अत्यंत गरजेचे आहे.

केळुसकर यांनी लिहिलेल्या गौतम बुद्‌ध,विद्रोही संत तुकाराम महाराज,स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रांचा अभ्यास समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी गरजेचा आहे.म्हणून प्रस्तुत संशोधन समाजाची घडी व्यवस्थित करण्यास मदत करेल.

पूर्व संशोधनाचा आढावा :

'कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या निवडक ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास' (१८६०-१९३४) या विषयावर आजपर्यंत कोणीही संशोधन केलेले नाही.परंतु कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या कार्यावर आणि साहित्यावर प्रकाश टाकण्याचा काही संशोधक व लेखकांनी प्रयत्न केलेला आहे.ज्यात धनंजय कीर,बाबा भांड,राजन गवस व सुरक्षा घोंगडे यांचा उल्लेख करता येईल.

संशोधन साहित्याचा आढावा :

'कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या निवडक ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास' (१८६०-१९३४) या विषयावर संशोधनकरण्यासाठी संशोधकाने केळुसकर यांच्या साहित्यावर प्रकाश टाकणारे संदर्भ ग्रंथ,संपादित ग्रंथ,नियतकालिके, वृत्तपत्रे,संकेतस्थळे इत्यादी साहित्याच्या आधारघेण्यात येणार आहे.

प्रकरण विभागणी

प्रकरण एक : प्रस्तावना आणि संशोधन पद्‌धती

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्‌धतीतील ऐतिहासिक संशोधन पद्‌धतीचा आणि विश्लेषणात्मक पद्‌धतीचा अवलंब करण्यात येणार आहे ज्यात नवीन सिद्‌धांत न मांडता वस्तुनिष्ठपणे मांडणी केलेली असते.

प्रकरण दोन : कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्या जीवन चरित्राचा व त्यांच्या समग्र साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात संशोधक कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्या जीवन चरित्राचा व त्यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेणार आहे, ज्यात केळूसकरांच्या जन्मापासून त्यांनी सत्यशोधक समाज, शेतकरी, कामगार आणि बहुजनसमाजाच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा आणि एक वृत्तपत्रलेखक,आद्यचित्रकारकार म्हणून लिहिलेल्या फ्रान्सचा जुना इतिहास (१८९३),तुकारामचरित्र अर्थात तुकारामबावांचे चरित्र,सेनेका व एपिक्टेटसची बोधवचने (१८९७),गौतम बुद्धांचे चरित्र(१८९८),सात उपनिषदांचे मराठी भाषांतर(१८९८),जुन्या कराराचे मराठी भाषांतर,राइट्स ऑफ मॅन(थॉमस पेन) चे मराठी भाषांतर, नीतिबोधमाला(भाग एक,दोन,तीन व चार),भगवद्गीतेवर टीकात्मक ग्रंथ(१९०२),छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र(१९०७),तसेच एलाप्पा बाळाराम,गुणाजीराव घुले,स्वामी गोविंद जनार्दन बोरकर,जनाबाई रोकडे,माधवराव रोकडे,म्युर मॅकेन्झी,रामचंद्र धामणस्कर इ. व्यक्तींच्या चरित्रग्रंथाचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तीन : केळुसकरलिखित 'फ्रान्सचा जुना इतिहास'या ग्रंथाचा ऐतिहासिक अभ्यास

'फ्रान्सचा जुना इतिहास' हा केळुसरांनी बडोदा संस्थानाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या विनंतीवरून या the story of nation लेखमालेसाठी भाषांतर केलेला त्यांचा पहिला ग्रंथ आहे. सयाजीरावांनी सदरील ग्रंथाच्या भाषांतराचे कार्य बहुजनाच्या शुद्र माणसाला दिले ही बाब बडोदा संस्थानातील काही उच्चवर्णीयांना पचनी पडली नव्हती.

तरीही महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केळुसकरांवर ती जबाबदारी सोपवली आणि केळुसकरांनी सुद्धा दर्जेदारपणे तो ग्रंथ भाषांतरित केला. १८८३ साली प्रकाशित झालेल्या या ग्रंथामुळे केळुसकरांना नवीन ओळख मिळाली. इथूनच पुढे त्यांच्या हातून अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिण्यास सुरुवात झाली.प्रस्तुत प्रकरणात केळुसकरलिखित 'फ्रान्सचा जुना इतिहास'या ऐतिहासिक साहित्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चार : केळुसकरलिखित 'संत तुकाराम अर्थात तुकारामबावांचे चरित्र' ग्रंथाचा विश्लेषणात्मक अभ्यास

संत तुकाराम महाराज १७व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले महान संत होते. ज्यांनी भागवतधर्माच्या मंदिरावर कळस चाढविण्याचे कार्य केले असे बहिणाबाई म्हणतात.आज तुकाराम महाराजांवर विविध भाषेत विपुल प्रमाणात लिखाण झालेले आहे आणि अनेकांनी शोध निबंध प्रकाशित केले आहेत.परंतु एकोणिसाव्या शतकात महीपतीने लिहालेल्या ओवीबद्धचरित्र सोडले तर तुकारामांच्या चरित्रावर कसलेही लिखाण झालेले नव्हते. एका इंग्रज अधिकाऱ्यांने थोडक्यात का होईना पण त्यांच्या वर लेख लिहिलेला आहे.एवढे साहित्य सोडता तुकारामांच्या आयुष्यावर लिखाण मिळत नव्हते. सुरुवातीला लक्ष्मण नागवेकर यांच्या आध्यात्मिक ज्ञानरत्नावलीमध्ये केळुसकरांनी 10 पाने लिखाण केले. त्यांनी त्याकरीता तुकारामतात्या पडवळ यांनी लिहिलेल्या 'तुकाराम बाबांची अभंग गाथे'च्या आधार घेतला.१८९६ साली मराठी भाषेत तुकाराम महाराजांच्या चरित्रावर आधारित २०८ पानी ग्रंथाचे लिखाण केळुसकरांनी

केले.'संत तुकाराम अर्थात तुकारामबावांचे चरित्र' हा ग्रंथ प्रस्तुत प्रकरणात विस्तृतपणे अभ्यासला जाणार आहे.

प्रकरण पाच : **केळुसकरलिखित 'गौतम बुद्धांचे चरित्र' ग्रंथाचा विश्लेषणात्मक अभ्यास**

ज्या महामानवाने जगाला शांतीचा व अहिंसेचा संदेश दिला. त्या गौतम बुद्धांवर मराठीमध्ये अभ्यासपूर्ण आणि दर्जेदार चरित्रग्रंथ उपलब्ध नव्हता. १८९८ साली केळुसकरांनी गौतम बुद्धांवर मराठीमध्ये दर्जेदार ग्रंथ लिहून पूर्ण केला. तो ग्रंथ त्यांनी आपल्या आवडत्या शिष्याला भेट दिला.या ग्रंथामुळे डॉ. आंबेडकर बौद्ध धर्माकडे वळले असे काही विद्वानांचे मत आहे. प्रस्तुत प्रकरणात 'गौतम बुद्धांचे चरित्र' या ग्रंथातील केळुसकरांच्या लेखनाचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहा: केळुसकरलिखित 'क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' या ग्रंथाचा विश्लेषणात्मक अभ्यास

१९०६ साली केळूसकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ५९८ पानी चरित्रग्रंथाचे लेखन केले. १९०७ साली निर्णयसागर छापखान्यात तो छापून प्रकाशित करण्यात आला. या चरित्रग्रंथात केळूसकरांनी दादोजी कोंडदेव,रामदास स्वामी हे शिवरायांचे गुरू नव्हते. शिवाजी महाराजांनी रामदास स्वामींच्या सल्याने स्वराज्याचे तोरण बांधले नाही असे ठाम मत मांडले. हा ग्रंथ लिहितांना केळूसकरांनी वस्तुनिष्ठपणावर भर.त्यांनी कोणाचीही भिड न ठेवता विवेकवादी दृष्टिकोनातून हा ग्रंथ लिहिला.प्रस्तुत प्रकरणात

संशोधकाकडून केळूसकरांच्या त्या वस्तुनिष्ठवादी लिखाणाचा विस्तृत आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण सात : समारोप,निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधक गृहितकांची संशोधन,मुलाखती व प्रश्नावलीच्या माध्यमातून पडताळनी करून निष्कर्ष मांडणार आहे आणि शिफारशी सादर करणार आहे.

संदर्भ सूची

१) प्राथमिक साधने

१) केळुसकर,कृष्णराव अर्जुन,फ्रान्सचा जुना इतिहास (१८९३)

२) केळुसकर,कृष्णराव अर्जुन, तुकारामचरित्र अर्थात तुकारामबावांचे चरित्र(१८९६),

३) केळुसकर,कृष्णराव अर्जुन,गौतम बुद्धांचे चरित्र(१८९८),

४) केळुसकर,कृष्णराव अर्जुन,नीतिबोधमाला (भाग एक, दोन, तीन आणि चार)

५) केळुसकर,कृष्णराव अर्जुन,क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र(१९०७)

६) केळुसकर,कृष्णराव अर्जुन,श्रीमद् भगवद्गीता समन्वय बोध,सार्थ आणि सटीक,

७) मुलाखती

८) प्रश्नावली

२) दुय्यम साधने

२.१ **ग्रंथ**

१)कीर,धनंजय, गुरुवर्य केळुसकरांचे आत्मचरित्र व चरित्रे ,साकेत प्रकाशन, आवृत्ती पहिली (२०१६)

२) सुरक्षा घोंगडे, महाराजा सयाजीराव आणि कृष्णराव अर्जुन केळुसकर, आवृत्ती पहिली

२.२ **संपादकीय**

१) विचारसंग्रह, गुरुवर्य केळुसकर गौरव मंडळ १९३४, मुंबई.

२) छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, राजन गवस (संपा.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३) संत तुकाराम अर्थात तुकारामबावांचे चरित्र, बाबा भांड (संपा.),

४) गौतम बुद्धांचे चरित्र, बाबा भांड (संपा) साकेत प्रकाशन

२.३ **नियतकालिक**

१) लोकप्रभा (२० ऑगस्ट २०२०)

२.४ **वृत्तपत्रे**

१) दै. लोकसत्ता (पुणे आवृत्ती - ३ डिसेंबर २०१७)

२.५ **संकेतस्थळे**

१) www.marathivishwkosh.com

२) www.wikipidia.com

२.६ **छायाचित्रे**

२.७ **परिशिष्ट्ये**

संशोधक

भागुअत सुरेशराव जाधव
(एम.ए.इतिहास,सेट)
ता.गंगाखेड,जि.परभणी

मार्गदर्शक

डॉ.सचिन उत्तमराव हंचाटे
संशोधन मार्गदर्शक,सहयोगी प्राध्यापक
तथा इतिहास विभागप्रमुख,
मास्टर दीनानाथ मंगेशकर महविद्यालय,
औराद शहाजानी,ता.निलंगा,जि.लातूर.